नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०३/१०/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील खापा टी पॉईंट पाटणसावंगी येथे दिनांक ०२/१०/२०२२ चे ०५.०० वा. ते ०६.०० वा. दरम्यान खापा टी पॉईट पाटणसावंगी येथे चालक/मालक आरोपी क्र. १) जेहरु सहजलाल पांचे, वय ४७ वर्ष, रा. दुर्गा माता मंदीर जवळ, गंगा नगर, सादिकाबाद कॉलनी न्यु रिंग रोड, मानकापुर नागपूर, २) गणेश टिलकचंद मात्रे, वय ३७ वर्ष, रा. दुर्गा माता मंदीर जवळ, झिंगाबाई टाकळी, नागपूर यांनी संगनमत करून त्यांच्या ताब्यातील एमएच– ४०/एके– २३९१ क्रमांकाचा टिप्पर किमंती ७,००,०००/–रु. ज्यामध्ये ४ ब्रॉस रेती किमंती ४२,४००/–रु. तसेच एमएच– ४०/सीडी– २४९१ क्रमांकाचा टिप्पर किमंती १०,००,००/–रु. ज्यामध्ये ४ ब्रॉस रेती किमंती ४२,४००/–रु. असा एकुण टिप्पर व रेती किमंत १७,८४,८००/–रु. मुद्देमाल बेकायदेशीररित्या विना परवाना शासनाचा कर चुकवून अवैधरित्या गौण खनिज (रेती) ची कोठुनतरी चोरी करुन वाहतुक करतांना मिळुन आले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस शिपाई अंकुश मुळे पोस्टे सावनेर यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार बंडु कोकाटे मो.नं. ९८२२९४३६०५ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. काटोल**:– दिनांक ०२/१०/२०२२ चे १८.०० वा. ते १८.१५ वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय २२ वर्ष ही घरासमोर झाडत असतांना आरोपी नामे– निलेश उईके, वय अंदाजे २५ वर्ष, रा नायगांव चिचाळा हा दारू पिवुन आला व तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. त्यामुळे फियादी ओरडली असता तेवढयात कोणीतरी तेथे आला असता त्याला फिर्यादी व आरोपी असे दिसले असता आरोपीने फिर्यादीला सोडून दिले व 'तु जा कोणालाही सांगितले तर तुझे भावाला मारेल अशी धमकी दिली.'

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ (अ), ५०६ भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा मोरे मो. नं. ९०४९६०७११५ या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर